# स्थूल अर्थशास्त्र

# प्रास्ताविक

## 1.1 स्थूल अर्थशास्त्र - अर्थ, व्याप्ती, महत्व आणि मर्यादा

<u>अर्थ :</u>

Makros = या ग्रीक शब्दांपासून = Macro

अनेक वेगवेगळया संज्ञा = साकलिक अर्थशास्त्र

समष्टी अर्थशास्त्र

समग्रलक्षी अर्थशास्त्र

समदर्शी अर्थशास्त्र

# स्थूल अर्थशास्त्राच्या विविध व्याख्या

१. प्रा. जे.एल. हॅन्सन यांच्या मते, “एकूण रोजगार, एकूण बचत आणि एकूण भांडवल गुंतवणूक व राष्ट्रीय उत्पन्न यासारख्या मोठया समुच्चयातील संबंधाचा विचार करणारी अर्थशास्त्राची शाखा म्हणजे स्थूल अर्थशास्त्र होय.”

२. प्रा. के.ई.बोल्डिंग यांच्या मते,“ स्थूल अर्थशास्त्रात व्यक्तिगत नगसंख्येचा अभ्यास न करता एकुण नगसंख्येचा अभ्यास केला जातो. प्रत्येक किंमतीचा स्वतंत्र नव्हे तर किंमत पातळीचा,व्यक्तिगत उत्पादन प्रदानाचा नव्हे तर राष्ट्रीय उत्पादनाचा अभ्यास केला जातो. ”

३. प्रा. ॲक्ले यांच्या मते, “अर्थव्यवस्थेतील समग्र उत्पादन, साधनसंपत्तीच्या वापराचे प्रमाण, राष्ट्रीय उत्पन्नाचे आकारमान आणि सर्वसामान्य किमतीची पातळी यांसारख्या चलांशी समग्रलक्षी अर्थशास्त्राचा संबंध असतो. ”

# स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती

## स्थूल आर्थिक घटक

एकूण मागणी , एकूण पुरवठा, एकूण बचत, एकूण बचत, एकूण रोजगार इ.अभ्यास केला जातो.

## स्थूल आर्थिक सिध्दांत

१. उत्पन्न आणि रोजगार विषयक सिध्दांत

२. सर्वसामान्य किंमत पातळीचे सिध्दांत

३.आर्थिक विकासाचे सिध्दांत

४.विभाजनाचा स्थूल सिध्दांत

## स्थूल आर्थिक धोरणे

१. चलन विषयक धोरण

२. राजकोषीय धोरण

३.आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक धोरण

# स्थूल अर्थशास्त्राचे महत्व

१.संपूर्ण अर्थव्यवस्थेचे ज्ञान :

२.आर्थिक धोरण ठरविण्यास उपयुक्त:

३.आर्थिक सिध्दांताची व्यवहारिक उपयुक्तता:

४.देशाच्या एकूण कामगिरीचे मल्यमापन

५.चलनविषयक समस्यांचे विश्लेषण

६.सर्वसाधारण बेकारीचा अभ्यास

७.आर्थिक चढ उतारांचे विश्लेषण

८.आर्थिक वृध्दीच्या प्रक्रियेत मदत

9.आंतरराष्ट्रीय व्यापाराचे विश्लेषण

10. व्यावसायिक निर्णयात महत्व

# स्थूल अर्थशास्त्राच्या मर्यादा

१.मापनासंबंधी अडचणी

२.समाजाच्या रचनेकडे दुर्लक्ष

३.व्यक्तिगत घटकांकडे दुर्लक्ष

४.स्थूल अर्थशास्त्रातील विरोधाभास

५.सांख्यिकी व संकल्पनात्मक अडचणी

६.समग्रलक्षी चले नेहमीच महत्वाची नसतात

७.समुच्चय एकजिन्सी समजणे

| १.२ सूक्ष्म अर्थशास्त्र | फरक स्थूल अर्थशास्त्र |
|---|---|
| १. लहान घटकांचा अभ्यास | १. समग्र घटकांचा अभ्यास |
| २. व्यक्तिनिष्ठ किंवा वस्तुनिष्ठ | २. समाजनिष्ठ असते |
| ३. प्रारंभ आगोदर - ॲडम स्मिथ, जे.बी.से.,मॉरीस डॉब , मार्शल ,हिक्स इ. अर्थशास्त्राज्ञांनी विकास केला | ३. प्रारंभ नंतर - माल्थस, सिसमाँडी, कार्ल मार्क्स, वॉलरा, विकसेल, फिशर, इ. अर्थशास्त्राज्ञांनी विकास केला |
| ४.सूक्ष्म अर्थशास्त्र निव्वळ तत्वांची चर्चा करते. | ४. राष्ट्राला उपयुक्त ठरेल अशा विविध धोरणांची चर्चा करते. |
| ५.सूक्ष्म अर्थशास्त्रात स्थितीशील दृष्टीकोन विचारात घेतला जातो. | ५. स्थूल अर्थशास्त्रात गतीशील दृष्टीकोन विचारात घेतला जातो. |
| ६.सीमांत उपयोगीतेच्या विश्लेषणाच्या आधारावर सूक्ष्म अर्थशास्त्र आधारीत आहे. | ६. कालबाहय झालेल्या सीमांत उपयोगीतेच्या आधारावर स्थूल अर्थशास्त्र आधारीत नाही. |
| ७. सूक्ष्म अर्थशास्त्रात मागणीचा सिध्दांत,उत्पादन सिध्दांत, महत्तम कल्याणाचा सिध्दांत,मुल्य सिध्दांत इ.चा समावेश होतो. | ७.स्थूल अर्थशास्त्रात उत्पन्न, रोजगार, सर्वसाधारण किंमतीचा सिध्दांत, व्यापारचक्राचे सिध्दांत, आर्थिक विकासाचे सिध्दांत इ.चा समावेश होतो. |
| ८. सूक्ष्म अर्थशास्त्रात निरनिराळया ठिकाणी आणि निरनिराळया व्यवसायात मजुरी दरात फरक का पडतो?याचे विश्लेषण केले जाते. | ८.स्थूल अर्थशास्त्रात मजुरीची पातळी आणि वेतनदर यांचे विश्लेषण केले जाते. |
| ९.सूक्ष्म अर्थशास्त्राला अंशलक्षी अर्थशास्त्र, व्यष्टी अर्थशास्त्र , असेही म्हणतात. | ९. स्थूल अर्थशास्त्राला समग्रलक्षी अर्थशास्त्र, समष्टी अर्थशास्त्र असेही म्हणतात. |

# राष्ट्रीय उत्पन्न- संकल्पना

१. डॉ. मार्शल यांच्या मते,‘ प्रतिवर्षी एखाद्या राष्ट्रातील श्रम, भांडवल, आणि नैसर्गिक साधनांच्या साहयाने ज्या मुर्त व अमूर्त अशा वस्तू व सेवांचे जे निव्वळ उत्पादन केले जाते त्याला राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.’

२. प्रा. फिशर यांच्या मते, ‘एका वर्षाच्या काळात राष्ट्राच्या निव्वळ उत्पादनापैकी जो भाग प्रत्यक्षपणे उपभोगासाठी वापरला जातो असा भाग होय.’

३. प्रा. पिगू यांच्य मते, ‘ज्या वस्तू व सेवांचे मोजमाप पैशाच्या स्वरुपात करता येते. त्याचाच समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावा.’


# राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पना

| स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Gross National Product ) | निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (Net National Production) | स्थूल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product) | दरडोई उत्पन्न (Per Capita Income) |
| --- | --- | --- | --- |
| स्थूल राष्ट्रीय उत्पादन म्हणजे देशातील व्यक्तींनी एका वर्षाच्या कालखंडात जेवढया अंतिम वस्तू आणि सेवांचे उत्पादन केलेले असते त्याची पैशात व्यक्त केलेली किंमत होय. | स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून घसारा वजा केल्यानंतर जे उत्पन्न शिल्लक राहते त्यास निव्वळ राष्ट्रीय उत्पादन असे म्हणतात. | एका वर्षाच्या काळात भौगोलिक सीमारेषेत देशातील लोकांनी आणि परकिय लोकांनी तयार केलेल्या उत्पादनास स्थूल देशांतर्गत उत्पादन असे म्हणतात. | देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नास एकूण लोकसंख्येने भागले असता देशाचे दरडोई उत्पन्न समजते. |
| GNP= GNP + (X-M)<br>X= निर्यात मुल्य<br>M= आयात मुल्य | NNP = GNP - घसारा खर्च | GDP=NNP+घसारा खर्च | PCI = एकूण राष्ट्रीय उत्पन्न / लोकसंख्या |

# १.४ राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह : व्दिक्षेत्रीय प्रतिमान

अर्थव्यवस्थेत उत्पन्न आणि खर्च हे सतत चक्राकार पध्दतीने प्रवाहित होत असतात , यालाच उत्पन्नाचा चक्रीय प्रवाह म्हणतात. यामध्ये बचत,गंतवणूक कर , कर्ज, सकरकारी खरेदी, आयात , निर्यात इ. अंतर्भाव होतो.

## व्दिक्षेत्रीय प्रतिमान




# १.५ निर्देशांक : अर्थ,पध्दती,महत्व आणि मर्यादा

**अर्थ :**

निर्देशांक म्हणजे आधारवर्षातील निर्देशांकाचे मूल्य १०० मानून यानूसार , संदर्भ वर्षातील बदलांच्या मूल्यांचे तौलनिक साधन होय.

प्रा. व्हेलडॉन यांच्या मते,‘ निदेशांक हे जेथे आधार सामग्रीच्या प्रत्यक्ष हालचालीचे मोजमाप अवघड असते किंवा शक्य नसते तेथे आधार सामग्रीच्या सापेक्ष हालचालीच्या निर्देशनासाठीचे सांख्यिकी साधन आहे.’


निर्देशांक तयार करण्याच्या पध्दती
भारित निर्देशांक
अभारित निर्देशांक
समुच्चय पध्दती
सापेक्ष मूल्यांची सरासरी
समुच्चय पध्दती
सापेक्ष मूल्यांची सरासरी

# निर्देशांकाचे महत्व

१. योग्य धोरण ठरविण्यासाठी

२. बदल समजण्यासाठी

३.प्रवृत्तींचा अभ्यास करण्यासाठी

४. किंमत पातळीतील बदलांचे मोजमाप

५.किंमत  आणि वेतनाचे समायोजन

६. विनिमय स्थैर्य

७. आर्थिक स्थितीची तुलना

८. दोन चलनांच्या खरेदी शक्तीची तुलना

९.कर्जफेडीच्या बाबतीतील समानता

| निर्देशांकाच्या मर्यादा |
| --- |
| 1. आधार वर्षाची निवड |
| २. निर्देशांकाचा उद्देश |
| ३. किमतीची निवड |
| ४. वस्तूची निवड |
| ५. सरासराची निवड |
| ६. योग्य सूत्राची निवड |
| ७. भाराची निवड |